# फ्लिपकार्ट क्विक हायपरलोकल सेवा आता आणखी ६ नव्या शहरांमध्ये, घरापर्यंत सुरक्षित डिलिव्हरी

- *फ्लिपकार्ट क्विक आता दिल्ली, गुरगाव, गाझियाबाद, नोएडा, हैदराबाद आणि पुणे येथील ग्राहकांनाही देणार सेवा*
- *ग्राहकांना कोविड- १९ काळातील अत्यावश्यक वस्तू, ताजी फळे आणि भाज्या, डेअरी, मांस, वाणसामान, मोबाइल्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि बेबी केअर उत्पादने ऑर्डर करता येतील, या वस्तू तुमच्या घरापर्यंत सुरक्षितरित्या आणि चटकन डिलिव्हरही होतील*
- *फ्लिपकार्ट क्विक टप्प्याटप्प्याने कोलकाता आणि मुंबई अशी महानगरे आणि इतर शहरांमध्येही व्याप्ती वाढवणार*

**बंगळुरु - २० एप्रिल** : फ्लिपकार्ट या भारतातील एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठेने फ्लिपकार्ट क्विक ही आपली हायपरलोकल सेवा दिल्ली, गुरगाव, गाझियाबाद, नोएडा, हैदराबाद आणि पुणे या सहा नव्या शहरांमध्ये उपलब्ध केली आहे. ग्राहकांना वेळेत त्यांच्या घरापर्यंत दैनंदिन अत्यावश्यक सेवांचा सुरक्षित आणि विनासायास पुरवठा करणे हा यामागील उद्देश आहे.

येत्या वर्षात टप्प्याटप्प्याने इतर महानगरे आणि शहरांमध्येसुद्धा ही हायपरलोकल सेवा सादर करण्याचा फ्लिपकार्टचा मानस आहे.

फ्लिपकार्ट क्विक २०२० मध्ये बंगळुरुमध्ये सादर करण्यात आले. फ्लिपकार्ट हब्सवरून त्यांच्या लोकेशनवर वस्तू ऑर्डर करणाऱ्या ग्राहकांना उत्पादनांची व्यापक उपलब्धता आणि वेगाने वस्तू डिलिव्हर करणे शक्य व्हावे या उद्देशाने ही सेवा सुरू करण्यात आली. हायपरलोकल डिलिव्हरी सेवेत ताजी फळे आणि भाज्या, डेअरी, मांस, वाणसामान, मोबाइल, इलेक्ट्रॉनिक्स आणि बेबी केअर अशा विविध विभागांमध्ये ३००० हून अधिक उत्पादने उपलब्ध आहेत.

ग्राहकांना उत्तम दर्जाची फळे आणि भाजीपाला योग्य किमतीत उपलब्ध व्हावा यासाठी अथ पासून इतिपर्यंत भक्कम परिसंस्था उभारण्यासाठी स्थानिक वेंडर्ससोबत केलेल्या धोरणात्मक भागीदारी आणि निंजाकार्टमधील कंपनीची गुंतवणूक यांचा फ्लिपकार्ट क्विकला लाभ मिळणार आहे. शॅडोफॅक्स या फ्लिपकार्टच्या धोरणात्मक लॉजिस्टिक भागीदाराचा फ्लिपकार्ट क्विकची लास्ट-माइल डिलिव्हरी करण्यात महत्वाचा सहभाग असणार आहे.

**फ्लिपकार्टचे उपाध्यक्ष संदीप कारवा** म्हणाले, "*ग्राहकाचा ऑनलाइन खरेदीचा अनुभव समृद्ध करण्यात आणि ई-कॉमर्स कंपन्यांसाठी पुरवठा साखळीचे कार्यचलन वृद्धिंगत करण्यात हायपरलोकल क्षमता फार मौल्यवान ठरतात. या क्षमता अधिक बळकट करण्यासाठी आणि ग्राहकांना वेगवान, विश्वासार्ह डिलिव्हरीज देण्यासाठी अशा परिसंस्थात्मक भागीदारी महत्त्वाच्या ठरतात. फ्लिपकार्ट ही ग्राहककेंद्री संस्था आहे आणि आमच्या ग्राहकांना*

*फक्त उत्कृष्ट मूल्य देण इतकंच नाही तर त्यासोबत स्थानिक शेतकरी आणि वितरकांना चालना देणे आणि उद्योजकतेला वेग देण्यास आम्ही बांधिल आहोत.*"

एक लवचिक आणि सर्वसमावेशक शेतमाल पुरवठा साखळी निर्माण करणे हा फ्लिपकार्टच्या प्रगती धोरणांचा मुख्य पाया आहे. ताजी उत्पादने मिळवण्याच्या कंपनीच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते आणि स्थानिक अन्नपदार्थ प्रक्रिया उद्योगाचा बाजारपेठेशी अधिक चांगल्या प्रकारे संपर्क निर्माण होतो. यंदा बाजारात सर्वप्रथम फ्लिपकार्ट क्विकने आपल्या बंगळुरु व्यासपीठावर रत्नागिरीचा हापूस आंबा उपलब्ध करून दिला. आता या सहा शहरांमधील ग्राहकांनाही हे आंबे ऑर्डर करता येतील आणि या स्थानिक उत्पादनाचा चविष्ट अनुभव घेता येईल.

फ्लिपकार्ट क्विकमुळे ग्राहकांना ऑनलाइन ऑर्डर देऊन पुढील ९० मिनिटांमध्ये डिलिव्हरी मिळवता येते किंवा त्यांच्या सोयीनुसार दोन तासांचा स्लॉट बुक करता येतो. ग्राहकांना त्यांच्या पहिल्या ऑर्डरवर आणि त्यापुढील ऑर्डर ४९९ रुपयांहून अधिक असल्यास मोफत डिलिव्हरी मिळते. ग्राहकांना दिवसाच्या कोणत्याही वेळी ऑर्डर देता येईल आणि सकाळी ६ ते मध्यरात्रीपर्यंत डिलिव्हरी मिळवता येईल.*

या संपूर्ण संकटकाळात फ्लिपकार्ट ग्रूपने पुरवठा साखळी, डिलिव्हरी एक्झिक्युटिव्ह आणि ग्राहकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे प्रयत्न केले आहेत. देशभरातील ग्राहकांना डिलिव्हरी देणाऱ्या हजारो डिलिव्हरी हिरोंनी ग्राहकांना वस्तूंच्या खरेदीसाठी घराबाहेर न पडण्याची सोय करून देत ग्राहकांना सुरक्षित ठेवले आहे. त्याचवेळी फ्लिपकार्टने लाखो विक्रेते/एमएसएमईजना त्यांची उत्पादने विकण्यासाठी एक सक्रिय बाजारपेठ उपलब्ध करून देत त्यांचे व्यवसाय सुरू राखण्यात साहय केले. इतकेच नाही, या प्रक्रियेत लाखो रोजगार निर्माण झाले ज्यांची अत्यंत आवश्यकता होती.

सध्या रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता, गेल्या काही महिन्यांपासून तयार करण्यात आलेल्या आणि अवलंबल्या जाणाऱ्या उच्चतम सुरक्षा नियम आणि एसओपीजचे पालन फ्लिपकार्ट सातत्याने करत आहे.

*रात्रीच्या वेळी ऑर्डर करताना कृपया रात्रीच्या संचारबंदीचे स्थानिक निर्बंध तपासून घ्या.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and Flipkart Wholesale. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 300 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratise e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions

of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more information, please contact media@flipkart.com.**